आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ मार्च २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात

- राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना केलं जाणारं व्यावसायिक एलपीजी वितरण ५० टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- बृहन्मुंबई वगळता राज्यात जानेवारी २०११ पर्यंत झालेली सरकारी जमिनीवरची निवासी अतिक्रमणं नियमीत करण्याचा शासन निर्णय जारी

- खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं केंद्रीय रसायन आणि खत मंत्र्यांचं प्रतिपादन

आणि

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ६९० अंकांची घसरण

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचे दर आटोक्यात राखण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात केली आहे. त्यामुळे पेट्रोलवरचं प्रतिलीटर १३ रुपये उत्पादन शुल्क ३ रुपयांवर आलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर १० रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकलं आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे.

दरम्यान डिझेलवरच्या  आणि विमानाच्या इंधनावरच्या निर्यातशुल्कात वाढ  केली आहे. डिझेलवर साडे एकवीस रुपये प्रतिलीटर तर विमान इंधनावर

साडे एकोणतीस रुपये प्रतिलीटर दराने निर्यात शुल्क लागू राहील. यामुळे या इंधनांचा देशांतर्गत पुरवठा वाढेल असं सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

इंधनावरचं उत्पादनशुल्क कमी करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केलं आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय जनकल्याणाविषयीची संवेदनशीलता आणि दूरदृष्टी दाखवणारा असल्याची प्रतिक्रिया फडणवीस यांनी समाज माध्यमावर दिली आहे.

**<><><><><>**

राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप ५० टक्क्यावरून ७० टक्क्यापर्यंत वाढवायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. हा अतिरिक्त एलपीजी प्रधान्यानं पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रसायनं आणि प्लॅस्टिक उद्योगांना पुरवला जाईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात एलपीजीचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यात जानेवारी २०११ पर्यंत झालेली, आणि सध्या अस्तित्वात असलेली सरकारी जमिनीवरची निवासी अतिक्रमणं नियमीत केली जाणार आहेत. यातून बृहन्मुंबईला वगळलं आहे.

राज्यातल्या गरीब आणि गरजू कुटुंबांना घरं देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या सूचनेनंतर, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा घेतला निर्णय घेतला आहे. यासाठी पात्रता आणि अंमलबजावणीची

कार्यपद्धती ठरली असून, ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. याबाबत महसूल विभागाचा शासन निर्णय जारी झाला आहे.

**<><><><><>**

लॉकडाऊन लागणार नाही हे, केंद्र सरकारने जाहिर केलेलं आहे. जे लोक असे अफवा पसरवत आहेत त्या सगळ्यांवर फौजदारी कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला. आखाती देशातील युद्धस्थितीमुळे इंधन टंचाई आणि लॉकडाऊन लागणार असल्याच्या अफवांचे त्यांनी स्पष्ट शब्दात खंडन केलं. खोटी माहिती फेसबुक, एक्स किंवा कुठल्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर टाकणं किंवा या खोट्या पोस्ट व्हॉट्सॲपच्या माध्यमातून फॉरवर्ड केलं तरी गुन्हा ठरेल. आणि अशा गुन्ह्यातल्या प्रत्येकावर फौजदारी कारवाई होऊ शकते. या खोट्या अफवा पसरवू नका अन्यथा फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधत आहेत.

**<><><><><>**

गेल्या दशकात युरियाचं देशांतर्गत उत्पादन २ कोटी ३० लाख मेट्रिक टनांवरून ३ कोटी १५ लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढल्याची माहिती केंद्रीय रसायन आणि खते मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या

उत्तरात दिली. खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं ते म्हणाले..

**- - होल्ड.. बाईट - नड्डा - -**

जागतिक पातळीवर जेनेरिक औषधांच्या पुरवठ्यापैकी भारताचा वाटा ३० टक्के असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी लोकसभेत दिली.

**<><><><><>**

सर्व क्षेत्रांमध्ये झालेली व्यापक विक्रीचा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारांवर झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर सोळाशे नव्वद अंकांची घसरण झाली आणि तो ७३ हजार ५८३वर पोहोचला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४८७ अंकांची घट नोंदवत २२ हजार ८२० वर बंद झाला. सेन्सेक्समध्ये नोंदणीकृत ३० पैकी २७ कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली.

**<><><><><>**

भोंदू अशोक खरात प्रकरणात अतिशय सखोल चौकशी सुरू असून आर्थिक फसवणुकीचे प्रकारही उघड झाले आहेत. लवकरच तसे गुन्हे नोंदवले जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत बातमीदारांना सांगितलं. या प्रकरणातल्या पीडीत महिलांच्या गोपनीयतेचं संरक्षण केलं जात असल्यानं अन्य पीडित महिलाही तक्रारींसाठी पुढे येत आहेत. मात्र, काही लोक गोपनीयतेचा भंग करण्याच्या प्रयत्नात असून त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

नाशिकमधे समाज माध्यमांवर पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ, फोटो तसंच एआय तंत्रज्ञानाच्या मदतीनं मॉर्फिंग केलेली सामुग्री प्रसारित करणाऱ्या ६५ अज्ञात व्यक्तींविराेधात आज गुन्हा दाखल करण्यात आला. कालही सातपूर पोलिस ठाण्यात या प्रकरणी सहा जणांवर गुन्हे दाखल केले असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान खरात प्रकरणात महिला आयाेगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करावं, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे. त्या आज नाशिक इथं वार्ताहर परिषदेत बोलत होत्या. अंधारे तसंच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांची भेट घेऊन भोंदू बाबा प्रकरणात चाकणकर यांच्यावरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांच्याकडे केली.

**<><><><><>**

सरकारने पंधराव्या वित्त आयोगांतर्गत चालू आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र आणि गोव्यासाठी पंचायती राज संस्था आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना ५९२ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचं अनुदान वितरित केलं आहे. याअंतर्गत महाराष्ट्राला पहिल्या टप्प्याचे ७९ कोटी रुपये तर गोव्यासाठी १२ कोटी रुपये वितरीत करण्यात आले. या अनुदानाचा उपयोग स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पावसाच्या पाण्याची साठवणूक आणि पाण्याच्या पुनर्वापर प्रकल्पासारख्या मूलभूत सेवांसाठी केला जातो.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//